# विद्यापीठांच्या अंतिम वर्षांचा निकाल सरासरीनेच

## मुख्यमंत्री : शाळांबाबतचा निर्णय लवकरच



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सध्याच्या परिस्थितीत विद्यापीठांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घेणे शक्य नसल्याने विद्यार्थ्यांना कॉलेजमधील सेमिस्टर परीक्षांच्या गुणांच्या आधारावर सरासरी गुण देऊन उत्तीर्ण केले जाईल. मात्र, ज्यांना परीक्षा द्यायची आहे, त्यांच्यासाठी तो पर्यायदेखील उपलब्ध करून दिला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज, रविवारी समाजमाध्यमाद्वारे संवाद साधताना केली. शाळांचे शैक्षणिक वर्ष कशाप्रकारे सुरू करायचे याचा निर्णय लवकरच घेतला जाईल, असे ते म्हणाले.

सध्याच्या काळात तातडीने परीक्षा घेणे शक्य नसले, तरी करिअरच्या महत्त्वाच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांना ताटकळत ठेवणे योग्य नसल्याने सेमिस्टर परीक्षांमधील गुणांची सरासरी काढून विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले जाईल, असा निर्णय चर्चेनंतर घेण्यात आला आहे, असे ते म्हणाले. अशा सरासरीपेक्षा आपण जास्त मार्क मिळवू शकतो, असे वाटणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्यवेळी परीक्षा घेतली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

शाळा सुरू करण्यापेक्षा शिक्षण सुरू करणे महत्त्वाचे असून, जेथे शक्य पान ७ वर ▸

पुढारी

# विद्यापीठांच्या अंतिम वर्षांचा निकाल सरासरीनेच

(पान १ वरून) आहे तेथे शाळा सुरू करण्याबरोबरच शहरी भागात ऑनलाईन शिक्षणावर भर देण्यात येईल, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भविष्याची आम्हाला चिंता आहे, म्हणून या सर्व विद्यार्थ्यांची गुणांची सरासरी करून त्यांना अंतिम वर्षाच्या परीक्षेत गुण देण्यात येणार आहेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांना या गुणांवर आक्षेप असेल किंवा मला यापेक्षाही जास्त गुण मिळाले असते, असे वाटत असेल त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळेल, असे ठाकरे म्हणाले. सरकार सर्व काळजी घेत असले, तरी आपलेच काही लोक महाराष्ट्राला बदनाम करीत असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला.

पुढारी

# अंतिम वर्षाच्या ७५ हजार विद्यार्थ्यांना दिलासा

## सेमिस्टर परीक्षांमधील गुणांची सरासरी काढून पास करणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना सेमिस्टर परीक्षामधील गुणांची सरासरी काढून पास करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ७५ हजार विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन महिन्यापासून संचारबंदी व लॉकडाऊन आहे. काही दिवसांपूर्वी उच्च शिक्षण मंत्र्यांनी जुलै महिन्यात अंतिम वर्षातील अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याबाबत जाहीर केले होते. त्यानुसार विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या सुमारे दोनशे परीक्षा घेण्याचे घेण्याचे नियोजन जाहीर केले. परीक्षेसाठी सुमारे ७५ हजार विद्यार्थी बसणार होते. परीक्षा घेण्यास विद्यार्थ्यांसह विद्यार्थी संघटनांनी विरोध केला होता. दरम्यान, कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग पाहता उच्च शिक्षण मंत्र्यांनी अंतिम



शिवाजी विद्यापीठातून...

वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याबाबत यूजीसीला पत्र पाठवले होते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना सेमिस्टरच्या गुणांच्या सरासरीच्या आधारावर पास करण्याबाबत निर्णय जाहीर केला. यामुळे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. सरासरी गुण देऊन पास करण्याबाबत राज्य सरकारकडून आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा विचार करण्यात येईल. याबाबतची माहिती अधिकार मंडळासमोर ठेवून अंतिम निर्णय घेतला जाईल अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

Kolhapur Edition
1 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

# ‘एज्युकेशन वर्ल्ड’च्या क्रमवारीत

# शिवाजी विद्यापीठ राज्यात ५ व्या स्थानी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

एज्युकेशन वर्ल्ड या संस्थेने सर्वेक्षणाच्या आधारे केलेल्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठ राज्यात पाचव्या तर देशात ४३ व्या स्थानावर आहे.



राज्यासह देशातील विद्यापीठाच्या गुणवत्ता क्रमवारीबाबत दरवर्षी विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांकडून सर्वेक्षण करून मानांकन दिले जाते. एज्युकेशन वर्ल्ड या संस्थेच्या वतीने सर्वेक्षण करण्यात आले. यात विद्यापीठाचा अभ्यासक्रम, शिकविण्याची पद्धत, शिक्षकांची पात्रता, अनुभव, शिक्षकांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, विद्यार्थ्यांसाठीच्या रोजगार संधी, पायाभूत सुविधा, नेतृत्व, प्रशासकीय गतिमानता यासह अन्य गोष्टींचा विचार करून गुणदान करून मानांकने जाहीर करण्यात आली. यात शिवाजी विद्यापीठास ८६९ गुण मिळाले आहेत. क्रमवारीत पहिल्या ५० मध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, अंतर्गत व गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. आर. के. कामत यांनी दिली.

Kolhapur Edition
1 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# विद्यापीठात अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त रविवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, इतिहास अधिविभागाचे डॉ. अवनिश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, इतिहास अधिविभागाचे डॉ. अवनिश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

## शिवाजी विद्यापीठातही जयंती साजरी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, इतिहास अधिविभागाचे डॉ. अवनिश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

# अंतिम वर्षाची परीक्षा नाही

**मुंबई, ता. ३१ :** सध्याच्या परिस्थितीत विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे शक्य नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये झालेल्या सेमिस्टर परीक्षांच्या आधारावर उत्तीर्ण करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. त्यांनी फेसबुकच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधला, त्यावेळी ही घोषणा केली. करिअरच्या महत्त्वाच्या टप्प्यांवर विद्यार्थ्यांना ताटकळत ठेवणे योग्य नाही. त्यामुळे सेमिस्टर परीक्षांमधील गुणांची सरासरी काढून विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्यात येईल. परीक्षा घेण्याबद्दल कुलगुरुंची मते जाणून घेतली.


परीक्षा - विद्यार्थ्यांची आणि अस्तित्वाची

**अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचा आग्रह अनाठायी आहे, असे सांगणारा लेख 'सकाळ'ने २९ मे २०२०च्या अंकात प्रसिद्ध केला होता.**

# विद्यापीठात अहिल्यादेवींना अभिवादन

कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, इतिहास अधिविभागाचे डॉ. अवनीश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.